# जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड
## स्टेशन रोड, नांदेड – ४३१६०१

E-mail : mahnandc@mhstate.nic.in
Telephone No. : 02462 - 241488 Fax No. : 02462-244682

# निविदा सूचना

याद्वारे कळविण्यात येते की, नांदेड जिल्हा न्यायालयास युपीएस ६०० व्ही.ए. साठी 12 Volt 7 Ah / 20 HR बॅटरी अंदाजे संख्या ११० खरेदी करावयाची आहे.

करिता याद्वारे बॅटरी खरेदीस्तव स्थानिक बाजारातील इच्छूक पुरवठादारांकडून खालील अटी व शर्तीनुसार सीलबंद निवीदा मागविण्यात येत आहेत.

तरी, इच्छूक पुरवठादारांनी **दिनांक २४ सप्टेंबर, २०२१** किंवा त्यापुर्वी कार्यालयीन वेळेत **मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड यांचे नांवे** सीलबंद निविदा या कार्यालयास सादर कराव्यात. तसेच सीलबंद निविदा लिफाफ्यावर **"युपीएस ६०० व्ही.ए. साठी बॅटरी पुरवठा करण्यासाठीची निविदा"** असा उल्लेख करावा.

## युपीएस ६०० व्ही.ए. साठी बॅटरी साठीची निवीदा खालील निकष व अटींनुसार मंजूर करण्यात येतील.

- बॅटरी (12 Volt 7 Ah / 20 HR ) अंदाजे एकुण संख्या ११० खरेदी करावयाची असल्यामुळे बॅटरीच्या कंपनीचे नाव व वारंटी कालावधी याचा स्पष्ट उल्लेख निविदेसोबत जोडण्यात यावा.
- निवीदा दाखल करणाऱ्या इच्छूक पुरवठादाराकडे PAN / GST / सेल्स टॅक्स नंबर असणे आवश्यक असून त्याची स्वसाक्षांकित प्रत निविदेसोबत जोडण्यात यावी.
- निवीदा दाखल करणाऱ्या इच्छूक पुरवठादाराने निविदेसोबत सदरहूची बॅटरी पुरविण्याबाबत शासनाकडून दुकाने व आस्थापनांची नोंदणी अधिनियमांतर्गत प्राप्त दुकानाची/आस्थापनेची नोंदणी असणारे व मुदत दर्शविणारे दस्त सोबत जोडणे आवश्यक आहे.
- बॅटरी च्या दर्जानुसार मंजूरी देण्यात येईल. तसेच, किंमत व दर देखील विचारात घेतले जातील.
- निवीदेतील मंजूर बॅटरी ही निविदेमध्ये नमूद तथा नामांकीत कंपनीची तसेच दर्जेदार असावी.
- पुरवठा करण्यात आलेली बॅटरी समाधानकारक असल्याची खातरजमा झाल्यानंतरच आपले देयक अदा केले जाईल.
- मंजूर निवीदेतील बॅट—या हया नांदेड जिल्हा न्यायालयास पुरवठा कराव्या लागतील, तसेच यासाठी कोणताही वाहतुक व प्रवास खर्च आणि त्यानुषंगीक कोणतेही भत्ते पुरवठादारास अनुज्ञेय असणार नाहीत. तसेच दरपत्रक हे सर्व करांसहीत असावेत.
- मंजूर निवीदेतील बॅटरी चा खरेदी आदेश मंजूर पुरवठादारास ई—मेलद्ववारे/दूरध्वनीद्वारे कळविण्यात येईल व त्यानुसार तात्काळ पुरवठा करणे बंधनकारक राहील.

- निवीदाधारक/पुरवठादाराकडून वस्तू पुरवठयानंतर सदरचे उधार मागणी बील प्राप्त झाल्यानंतर खरेदी खर्चाचे देयक उपलब्ध अनुदानानुसार तसेच, कोषागारातुन देयक पारित झाल्यानंतर पुरवठादारास ऑनलाइन अदा करण्यात येईल.
- देयक अदा झाल्यानंतर देयकाची पावती सादर करावी लागेल.
- बॅटरीची किंमत व दर्जानुसार पुरवठादारांची निविदा मंजूर केली जावू शकते.
- सदरहू निवीदेमध्ये कोणत्याही क्षणी कोणत्याही कारणाशिवाय बदल, दुरूस्ती किंवा सुधारणा करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवला आहे.
- सदरहू करण्यात आलेला दरकरार / निवीदा कोणत्याही क्षणी कोणत्याही कारणाशिवाय मंजूर अथवा रद्द करण्याचा संपूर्णतः अधिकार हा या कार्यालयाचा राहील.
- निविदेबाबतच्या विवादासाठी न्यायिक क्षेत्र नांदेड असेल.
- तसेच निविदाधारकाची निविदा मंजूरीनंतरही प्रत्यक्ष खरेदी करतेवेळी शासनाच्या GeM Portal वरील दर पाहून GeM वरील दर कमी असल्यास GeM Portal वरुन खरेदी करण्याचे स्वातंत्र्य या कार्यालयास राहिल.

''आदेशावरून''

जिल्हा न्यायालय, नांदेड }

दिनांक : ०८ सप्टेंबर, २०२१ }

8.9.2021
**प्रबंधक,**
जिल्हा न्यायालय, नांदेड

<u>जा.क्र./संगणक विभाग/4980/२०२१</u>

प्रती,

- अधिक्षक, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, नांदेड यांना सदरहू निवीदा सूचना अग्रेषीत करण्यात येवून कळविण्यात येते की, त्याची एक प्रत बेलीफामार्फत <u>तात्काळ</u> खालील ठिकाणी डकविण्यात यावी व मुळ गोषवारा संगणक विभागास परत करण्यात यावा.

१) जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड यांचे नोटीस बोर्ड
२) दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, नांदेड यांचे नोटीस बोर्ड
३) मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, नांदेड यांचे नोटीस बोर्ड
४) जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांचे नोटीस बोर्ड

8.9.2021
**प्रबंधक,**
जिल्हा न्यायालय, नांदेड